DEEPER/DCT-11/MDM/Jan-2/1026(110) दि. २१/१२/२०१०

**प्रति,**
**डीपर विभागीय प्रमुख/समन्वयक**
**डीपर जिल्हा प्रमुख/समन्वयक**

**विषय : DCT - 2011 चे साहीत्य वितरण बैठक रविवार दि. २ जानेवारी, २०११**

**महोदय,**

डीपरची DCT - 2011 रविवार दि. ९ जानेवारी २०११ ला नियोजित आहे आणि त्यासंदर्भातील सर्व कामकाज जोमात सुरू आहे. यावर्षी काही कॉलेजेसकडून फॉर्म भरून पाठविण्याची प्रक्रिया फार उशीरापर्यंत (अगदी दि. १८/१२/२०१०) लांबल्यामुळे नाईलाजास्तव दि. २६/१२/२०१० ला नियोजित DCT - 2011 च्या साहित्य वितरणाचा कार्यक्रम एका आठवड्याने पुढे ढकलून **रविवार दि. २ जानेवारी, २०११ ला सकाळी १०.०० वाजता, मराठवाडा मित्र मंडळाच्या ज्ञानेश्वर सभागृहात** आयोजित केलेला आहे. यावर्षीच्या नियोजित कार्यक्रमातील हा पहिलाच प्रसंग आहे जो आपण ठरलेल्या वेळेपेक्षा पुढे ढकलला आहे. त्यासाठी आणखीही महत्त्वाची कारणे आहेत ती अशी:

(१) आपण विदर्भासाठीचे साहित्य अमरावती किंवा यवतमाळवरून वितरीत करणार होतो. मात्र विद्यार्थीसंख्या कमी असल्याने आता ते पुण्याहूनच शक्य आहे.

(२) परीक्षेसाठी लागणारी सर्व रोख रक्कम आपण केंद्र प्रमुखांकडे सुपूर्द करतो. जर २६ तारखेलाच त्याचे वितरण झाले तर कदाचित केंद्र प्रमुखांची जबाबदारी नाहक वाढेल. २ तारखेला वितरणानंतर लगेचच ५ तारखेला त्यांना केंद्रावर नियुक्त करण्यात येणाऱ्या इतर सहकाऱ्यांचे नियोजन सोपे जाईल.

(३) Admit Card वाटपाचा कालावधी वाढल्याने तेवढे दिवस संबंधित गुंतून पडतील त्यापेक्षा ही प्रक्रिया २-३ दिवसातच संपेल.

(४) उशीराने फॉर्म आल्याने याद्या तपासून पाहायला वेळ मिळाला नसता तो ७ दिवसांचा वाढीव मिळेल व प्रक्रिया अचूक व्हायला मदत होईल.

या बैठकीसाठी केंद्रनिहाय १ प्रतिनिधीला पुण्याला प्रशिक्षणा साठी यायचं आहे त्यामुळे आपणा सर्वांना विनंती आहे की, ज्यांना संबंधित केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती द्यायची आहे त्यांना **प्राचार्याचे ना हरकत प्रमाणपत्र** (अ) केंद्र म्हणून इमारत वापरासंबंधी (ब) केंद्राचे साहीत्य सूपूर्द करण्याविषयी (क) परीक्षा प्रक्रियेसाठी लागणारी एकूण रोख रक्कम सुपूर्द करण्यासाठी आणण्यास सांगावे.

या बैठकीसाठी येणाऱ्या सर्व सदस्यांना TA + Local Conveyance दिला जाईल. ३०० कि.मी. पेक्षा दूरहून येणाऱ्या सदस्यांना परतीच्या वेळेचा DA दिला जाईल. TA व DA ची रक्कम यापूर्वी ठरल्याप्रमाणेच दिली जाईल. या संदर्भात सर्व सदस्यांनी सहकार्य करावे व खर्चाचा नाहक बोजा वाढणार नाही याची काळजी घ्यावी. स्पष्ट सुचना देवूनही जे सदस्य या संदर्भातील नियम पाळणार नाहीत, त्यांच्यासाठी होणारा जादा खर्च जिल्हा मंडळाच्या तरतूदीतून वळता केला जाईल याची सर्व सदस्यांनी विशेष नोंद घ्यावी.

बहुतांशी जिल्ह्यांना त्यांचा जिल्हा फंड काय असेल याची कल्पना दिलेली आहेच मात्र ज्यांना त्यासंदर्भात काही अडचणी असतील किंवा शंका असेल तर दि. २ तारखेच्या बैठकीच्या वेळी लेखी कळवावे. त्याचप्रमाणे ज्या जिल्ह्यांना फंडाचे Advance हवे असतील त्यांनी जुने हिशेब सादर करून त्या संदर्भातील Demand Note सादर करावी. **पूर्वीचे हिशेब दिल्याखेरीज कोणताही नवीन Advance दिला जाणार नाही** याची सर्व सदस्यांनी नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे सर्व जिल्हा मंडळाच्या सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांच्या जिल्ह्याचे नवीन Account सुरू करायचे आहे. ज्या जिल्ह्यांना A/c उघडताना Problems असतील त्यांनी त्यांना नेमके कोणती कागदपत्र व काय प्रक्रिया हवी त्यासंदर्भात लेखी स्वरूपात माहिती कळवावी.

**धन्यवाद !**

**आपले**

हरीश बुटले
**संस्थापक सचिव, डीपर**

प्राचार्य नंदकुमार निकम,
**अध्यक्ष, डीपर**